पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**<u>कार्यपत्रिका क्रमांक ४२</u>**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ३१/१२/२०१९** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **<u>स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १९१४**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा–विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे नोव्हेंबर २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/८१९२ दि. २०/१२/२०१९ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १९१५**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १५ क मध्ये गुरूवार पेठ, सदाशिव पेठ, नारायण पेठ,शनिवार पेठेत ड्रेनेज लाईन व पावसाळी चेंबर समपातळीत करणे / देखभाल करणे, शुक्रवार पेठे व प्रभागात इतरत्र मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामांतर्गत शनिवार वाडा कोपरा (शुभश्री इमारत) ते पटवर्धन चौक (फुटका बुरूज) पर्यंत बाजीराव रस्त्याने मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड ZE16A104/SP2-2086 प्रभाग क्र. १५ क मध्ये विविध ठिकाणी वॉल्व दुरूस्त करून पाण्याची गळती थांबविणे. | २० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम-** | | |
| प्रभाग क्र. १५ क मध्ये गुरूवार पेठ, सदाशिव पेठ, नारायण पेठ,शनिवार पेठेत ड्रेनेज लाईन व पावसाळी चेंबर समपातळीत करणे / देखभाल करणे, शुक्रवार पेठे व प्रभागात इतरस्त्र मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामांतर्गत शनिवार वाडा कोपरा (शुभश्री इमारत) ते पटवर्धन चौक (फुटका बुरूज) पर्यंत बाजीराव रस्त्याने मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | -- | २० लाख |

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १९१६**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१ ते दि.१५ नोव्हेंबर २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पक्र.५/८८१ दि.२३/१२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १९१७**

दि. २५/११/२०१९ ते दि. १/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८८८ दि. २४/१२/२०१९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## संकीर्ण

**विषय क्र. १९१८**

श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट, आर स्केअर, शॉप नं.७,८,९ वारजे माळवाडी, मुंबई बेंगलोर हायवे,पुणे ही एक सेवाभावी रजिस्टर्ड संस्था असून सदर संस्थेमार्फत शहिद पत्नींना आर्थिक मदत, अपंगांना कृत्रिम अवयव मदत तसेच मार्गदर्शक व्याख्याने वेळोवेळी आयोजित केली जातात. सदर संस्थेस पुणे शहरात अनेक गरजू व्यक्तींना रक्ताची गरज भासल्यास त्यांना शासकीय दराने रक्त पुरवठा करणारी ब्लड बँक वारजे–कर्वेनगर भागात सुरू करायची आहे.

पुणे महानगरपालिकेचे कै.बिंदु माधव ठाकरे रूग्णालय, गोसावी वस्ती, कर्वेनगर,पुणे–५२ मधील ६ व्या मजल्यावरील हॉल सध्या विनावापर पडून आहे.

तरी सदरचा हॉल श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट या संस्थेस नाममात्र दराने व ३० वर्षे कालावधीसाठी ब्लड बँक सुरू करणेसाठी देण्याबाबत मा.डॉ.सौ.श्रद्धा प्रभुणे व मा. सौ.निलिमा खाडे यांचे दि.२३/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. २४३ दि.२३/१२/२०१९ विचारासाठी.

**विषय क्र. १९१९**

सन २०१९–२०२० चे मोटार वाहन विभागाकडील महसुली अंदाजपत्रकीय तरतुदीमधील अखर्चीत राहणाऱ्या तरतुदीमधून, आवश्यक असलेल्या व अपुऱ्या पडलेल्या महसुली अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर र.रुपये ३,२५,००,०००/– वर्ग करणेसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८९२ दि.२४/१२/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रक, मोटार वाहन विभाग, ११–यांत्रिक | | |
| मा. पदाधिकारी यांना शासकीय वाहनाऐवजी वाहन प्रतीपूर्ती भत्ता RE 21 A 107 | ५ लाख | ---- |
| बी आर सी व अन्य कचरा विषयक वाहनांचे ऑपरेशन व मेंटेनन्स खाजगीकरणाने करणे. RE 21 C 127 | ४० लाख | ---- |
| विविध रॅम्पवरील कामकाज व कचरा वाहतूक खाजगीकरणाने करणे. RE 21 C 128 | ४० लाख | ---- |
| समाविष्ट गावांतील कचरा व्यवस्थापनासाठी वाहने व अनुषंगिक कामे करणे RE 21 C 142 | १०० लाख | ---- |
| पुणे शहरातील विविध तलावातील जलपर्णी यांत्रिक पद्धतीने आऊटसोर्सिंग तत्वावर काढणे RE 21 C 143 | १४० लाख | ---- |
| सुचविलेली कामे<br>मोटार वाहन विभाग, | | |
| २ – पेट्रोल, डिझेल, ऑईल व सिएनजी साठी खर्च, RE 21 A 103 | ---- | १०० लाख |
| ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/तांत्रिक सेवकांचे वेतन RE 21 C 104 B | ---- | १०० लाख |
| अपघात नुकसान भरपाई, RE 21 C 114 | ---- | १०० लाख |
| आरटीओ विषयक कामे करणे RE 21 C 117 | ---- | २५ लाख |

उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)